CNRMHAH1900 1028 2023

## रे मु नं. २१०/२०२३ मध्ये नि.    वर आदेश

( भागचंद रुस्तूम मडके वि. रावसाहेब विठोबा मडके व इतर )

वादीने अर्जात असे म्हटले आहे की, वादीने दावा वाटपासाठी दाखल केला आहे. परंतु नजरचूकीने दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार प्रतिवादीपणात सामील करणे व वंशावळीमध्ये सामील करणे राहून गेलेले आहे. त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे गरजेचे आहे. सबब,

- दाव्याचे टायटल कलम २ वंशावळीमध्ये प्रतिवादी क्र.१ रावसाहेबचे खाली त्याची पत्नी कौसाबाई आणि मुलगा बाळासाहेब तसेच प्रतिवादी क्र २ ज्ञानदेवचे खाली त्याची पत्नी नेहाबाई आणि मुलगा शहादेव तसेच प्रतिवादी क्र ३ हौसाबाईचे खाली तिचा मुलगा बहिरनाथ तसेच प्रतिवादी क्र ४ चे खाली त्याची पत्नी कुसूमबाई व मुलगा अर्जुन असे लिहिण्याची व दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी.

- तसेच प्रतिवादी क्र ७ चे खाली
- प्रतिवादी क्र ८ कौसाबाई रावसाहेब मडके, वय ६५ वर्षे, धंदा शेती,
- प्रतिवादी क्र ९ बाळासाहेब रावसाहेब मडके, वय ५० वर्षे धंदा शेती,
- प्रतिवादी क्र १० नेहाबाई ज्ञानदेव मडके, वय ६५ वर्षे धंदा शेती
- प्रतिवादी क्र ११ शहादेव ज्ञानदेव मडके, वय ४५ वर्षे, धंदा शेती
- प्रतिवादी क्र १२ कुसूमबाई सुदामदेव मडके, वय ६० वर्षे, धंदा शेती
- प्रतिवादी क्र १३ अर्जुन सुदामदेव मडके, वय ४० वर्षे, धंदा शेती,
- प्रतिवादी क्र १४ बहिरनाथ नारायण फाटके, वय ५० वर्षे, धंदा शेती
- प्रतिवादी क्र १०, ११ रा. घोडेगाव, ता. नेवासा, जि.अहमदनगर
- प्रतिवादी क्र १४ रा. बक्तरपूर, ता. शेवगाव
- प्रतिवादी क्र ८,९,१२,१३ रा. सोनेसांगवी, ता. शेवगाव अशी दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी.

२. प्रतिवादीने अर्जाला म्हणणे देउन दुरुस्ती करण्यास हरकत नाही असे सांगितले आहे.

३. दोन्ही बाजूंचे युक्तीवाद ऐकले.

५. अर्जामध्ये नमूद दुरुस्तीचे अवलोकन केले असता वादीने दाव्याच्या टायटल कॉलम व वंशावळीमध्ये दुरुस्ती करुन मागितलेली आहे. दावा वाटपासाठी दाखल केलेला आहे. वाटपाच्या दाव्यामध्ये सर्व पक्षकार दाव्यामध्ये सामील असणे गरजेचे आहे. त्यामुळे दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यास मदत होणार आहे. सदरच्या दुरुस्तीने न्यायनिर्णयात दाव्यातील खरा वाद

सोडवण्यास मदत होइल. प्रतिवादीने देखील अर्ज मंजूर करण्यास हरकत नाही असे म्हणणे दिले आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. वादीने सदरची दुरुस्ती आदेशापासून १४ दिवसात करावी.

SANJANA UDAY JAGUSTE
Digitally signed by SANJANA UDAY JAGUSTE
Date: 2023.06.17 16:48:13 +0530

दि. १७/०६/२०२३ (एस. यू. जागुष्टे)
शेवगाव. दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शेवगाव